SARDAR SHRI GOVINDRAO ADIK LAW COLLEGE TRIMURTI PAWAN PRATISHTHAN'S ID No. PU/AN/LAW 56/1998 SHRIRAMPUR

# महाविद्यालयीन अभ्यासविषयक नियम व विद्यार्थी आचारसंहिता

## अ . सामान्य नियम व निर्बंध

१ . महाविद्यालयातील प्रवेशीत प्रत्येक विद्यार्थ्याकडे विद्यार्थी ओळखपत्र सक्तीचे आहे .

२ . विद्यार्थ्यांनी नियमितपणे सर्व तास, चाचणी परीक्षा आणि दिलेले ग्रहपाठ करणे अनिवार्य आहे . विद्यापीठ नियमांतर्ग ८० % उपस्थिती नसल्यास परीक्षा फॉर्म भरता येणार नाही .

३ . विषय शिक्षकांच्या विभागप्रमुख व वर्ग शिक्षकांच्या पुर्व परवाणगी शिवाय गैरहजर राहु नये .

४ . पालकांनी आपली पाल्यांची प्रगती वेळोवेळी घ्यावी . शक्य असल्यास पालकांनी वर्गशिक्षक व प्राचार्य यांना भेटावे .

५ . जर विद्यार्थ्यांची प्रगती अल्प, असमाधानकारक उपस्थिती व त्याचे गैरप्रकार आढळल्यास दंड आकारण्यात येईल .

६ . विद्यार्थ्यांना विषयांविषयी शंका असल्यास शिक्षकांशी प्रत्यक्ष किंवा ई-मेल व्दारे संपर्क साधावा .

## ब . वर्तणूकविषयक आचारसहिंता

१ . महाविद्यालयात वक्तशिरपणा ,शिस्तप्रियता, आदर्शवर्तन, चांगली जीवनमुल्य असावी .

२ . महाविद्यालयात विविध आयोजित अभ्यासेत्तर उपक्रमातील विद्यार्थी सहभाग अनिवार्य राहिल .

३ . महाविद्यालयातील प्रचलित आचारसहिंता नियमांचे पालन करणे विद्याथ्याचे कर्तव्य राहील .

४ . नियमांचे पालन न केल्यास संबधित विद्यार्थ्यांचा प्रवेश रदद करण्यात येईल .

५ . विद्यार्थी व शिक्षकांनी निर्देशित केलेल्या ठिकाणी आपली सायकल, मोटारसायकल ,स्कुटर्स इत्यादी वाहणे लावावीत , इतरत्र कुठेही परीसरात लावू नये .

६ . महाविद्यालयाच्या अथवा शिक्षण संस्थाच्या कोणत्याही प्रकारच्या इमारतीचे ,फर्निचरचे ,पुस्तकांचे, मालमत्तेचे नुकसान केले असता संबधित विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल .

७ . महाविद्यालयाच्या विविध कार्यक्रमाची व इतर शैक्षणिक परीपत्रके, परीक्षा, शिष्यवृत्या, कार्यक्रम या बाबतची माहिती नोटीस बोर्डावर लावण्यात येते . याव्दारे नोटीस बोर्डावरील माहिती घेण्याची सवय विद्यार्थ्यांना लागते . विद्यार्थ्यांना नोटीस न वाचल्यामुळे झालेल्या नुकसानास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही .

८ . महाविद्यालयाचे आवार, ग्रंथालय, वर्ग ,वसतीगृहे व इमारतीचे आवार स्वच्छ ठेवण्याची

ANASDAR SHRI GOVINDRAO ADIK LAW COLLEGE TRIMURTI PAWAN PRATISHTHAN'S ID No. PU/AN/LAW 56/1998 SHRIRAMPUR

जबाबदारी सर्व विद्यार्थ्यावर आहे .

९ . महाविद्यालयाच्या नावलौकिकास बाधा येईल असे वर्तन विद्यार्थ्यांनी करू नये . महविद्यालयाच्या परीसरात मोबाईल बंद ठेवावा व कोणी मोबाईल वापरताना आढळल्यास १०० रू . दंड करून मोबाईल जप्त केला जाईल .

१० . सर्व दुचाकी वापरणा-या विद्यार्थ्यांना हेल्मेट सक्तीचे आहे .

११ . सर्व विद्यार्थ्यानी नेमून दिलेल्या ड्रेसकोडचे पालन करावे .

**क . वर्ग चालू असताना विद्यार्थ्यानी सुचना कटाक्षाने पाळाव्यात .**

१ . सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सर्व विषयांचे तास करणे अनिवार्य आहे .

२ . विनाकारण व्हंराडयात फिरू नये .

३ . अनुमती घेऊनच वर्गात प्रवेश करावे .

४ . वर्गात अध्यापन चालू असताना शांतता ठेवली पाहीजे .

५ . विद्यार्थ्यांनी संबधीत प्राध्यापकांच्या परवाणगीने वर्गातून बाहेर जावे .

६ . भिंतीवर, जिन्यात ,व्हंराडयात किंवा वर्गात इतरत्र थूंकू नये .

७ . वर्ग चालू असताना बाहेर थांबू नये . वर्ग सोडून बाहेर फिरताना दिसल्यास दंड आकारण्यात येईल .

८ . महाविद्यालयाच्या प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी विद्यार्थ्यांनी स्वताः चे ओळखपत्र जवळ बाळगणे गरजेचे आहे .

## ❖ शिष्यवृत्ती व शैक्षणिक सवलती बाबत नियमावली

विद्यार्थी व विद्यार्थीनींना आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी वेळेवर अर्जाची पुर्तता करणे आवश्यक आहे आणि जे विद्यार्थी वेळेच्या आत अर्ज भरून देणार नाही अशा विद्यार्थ्यांच्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही .

१ . भारत सरकार मेट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना

२ . छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

३ . डॉ . पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

४ . अल्प संख्यांक शिष्यवृत्ती योजना